दै. पुण्यनगरी दि. 16/10/2023

# गावठी पिस्टल व ३ जीवंत काडतूसासह एका आरोपीस अटक

**नांदेड/प्रतिनिधी**

गुप्त माहितीवरुन दि.१५ ऑक्टोबर रोजी स्थागुशाच्या पथकाने एका २८ वर्षीय इसमाकडून ३ जीवंत काडतुस व एक गावठी पिस्टल जप्त केले.

गुप्त बातमीदाराकडून ग्रामीण पॉलीटेक्नीक ते पांगरा गावाकडे जाणाऱ्या मार्गावर एक जण गावठी पिस्टल बाळगून असून तो विक्री करणार असल्याचे कळाले . त्यानंतर स्थागुशा पथकाने ग्रामीण पॉलिटेक्नीक ते पांगरा गावाकडे जाणारे मार्गावर जाऊन सापळा रचला.

जमीर दिलावर शेख, २८, रा. सिकंदरपुर ता.जि. लातुर यास ताब्यात घेवून त्याच्याकडून विक्रीसाठी आणलेली एक गावठी पिस्टल, ३ जीवंत काडतूस असा एकूण ३६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



## स्थागुशाची कामगिरी

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनात स्थागुशाचे पोलिस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, सपोनि रवी वाहुळे, सपोनि पांडूरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, आशिष बोराटे, सचिन सोनवणे, गोविंद मुंडे, सपोउपनिरीक्षक माधव केंद्रे, पोहेकॉ गुंडेराव करले, संग्राम केंद्रे, हनमंत पोतदार,अफजल पठाण, बालाजी तेलंग, दीपक पवार, संजीव जिंकलवाड, देवा चव्हाण, विलास कदम, तानाजी येळगे, गजानन बयनवाड, रणणीरसिंघ राजबन्सी, ज्वालासिंघ बावरी, मारोती मोरे, सायबर सेलचे दीपक ओढणे, राजू सिटीकर यांनी ही कामगिरी पार पाडली.

दै. गोदातीर दि. 16/10/2023

# एक गावठी पिस्टल व ३ जिवंत काडतूसासह एका आरोपीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड–** गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी ग्रामीण पॉलीटेक्नीक ते पांगरा गावाकडे जाणाऱ्या रोडवर आलेल्या एकास पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी अटक केली. त्याच्याकडून एक गावठी पिस्टल, ३ जीवंत काडतूस जप्त करण्यात आले आहेत.



ग्रामीण पॉलीटेक्नीक ते पांगरा रस्त्यावर जमीर दिलावर शेख, वय (२८ वर्ष, रा. सिकंदरपुर ता.जि. लातुर) हा एक गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा लावून त्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व ३ जिवंत काडतूस असा एकूण ३६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, सपोनि रवि वाहुळे, सपोनि पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, आशिष बोराटे, सचिन सोनवणे, गोविंद मुंडे, सपोउपनि माधव केंद्रे, पोहेकॉ गुंडेराव करले, पोहेकॉ संग्राम केंद्रे, पोहेकॉ हनमंत पोतदार, पोहेकॉ अफजल पठाण, पोहेकॉ बालाजी तेलंग, पोना दिपक पवार, पोना संजीव जिंकलवाड, पोकॉ देवा चव्हाण, पोकॉ विलास कदम, पोकॉ तानाजी येळगे पोका गजानन बयनवाड, पोकॉ रणधिरसिंह राजबन्सी, पोकॉ ज्वालासिंघ बावरी, पोकॉ मारोती मोरे, सायबर सेलचे पोहेकॉ दिपक ओढणे व पोहेकॉ राजू सिटीकर यांनी ही कारवाई पार पाडली आहे.